**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**तहकुब सभा परिपत्र**

महिला व बाल कल्याण समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार,दिनांक ८/११/२०१७ रोजी तहकुब झालेली सभा ) बुधवार ,दिनांक २२/११/२०१७ रोजी दुपारी ३=२५ ( तीन वाजून पंचवीस मि. ) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

**सदर सभेत कार्यपत्रिका क्र.१५,दि. ८/११/२०१७ वरील विषय क्र. १४३ ते १४४ चा विचार होईल .**

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. १६**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २२/११/२०१७ रोजी दुपारी ३=३० ( साडे तीन ) वाजता म.ज्योतिबा फुले सभागृह ( स्थायी समिती सभागृहात ) भरेल

**विषय क्र. १४५**
**मा.योगेश समेळ व मा.हरिदास चरवड यांचे दि.३.११.२०१७ चे पत्र .**

पुणे शहर हे संपुर्ण देशामध्ये एक सांस्कृतिक नगरी म्हणून ओळख प्राप्त झालेले शहर आहे. या शहरामध्ये अनेक पुरातन वास्तू आहेत. यामध्ये प्रामुख्याने शनिवार वाडा, सारसबाग, पेशवे पार्क, संभाजी उद्यान, कात्रज येथील राजीव गांधी उद्यान या ठिकाणी मोठया प्रमाणावर इतर देशांतील, राज्यांतील आणि शहरातील नागरिक/महिला/बालके भेट देण्याकरिता येत असतात. या दरम्यान सदर ठिकाणी ब्रेस्ट फिडींग सेंटर (स्तनपान केंद्र) उपलब्ध नसल्याने अनेकवेळा महिलांना अडचणींना सामोरे जावे लागते व बालकाचे संगोपन करण्यास अडथळा निर्माण होतो.

तरी याच अनुषंगाने वरील नमूद केलेल्या वास्तूंच्या ठिकाणी त्वरीत ब्रेस्ट फिडींग सेंटर (स्तनपान केंद्र) सुरु करण्यात यावे.

**<u>विषय क्र. १४६</u>**

**<u>मा.संजय भोसले,गटनेते ,शिवसेना व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.६.११.२०१७ चे पत्र.</u>**

स.नं.१० अशोकनगर,श्रीराम मित्र मंडळ बालवाडीमागे,दुर्गामाता मंदिरा शेजारी दोन शौचालय जवळ – जवळ असून त्यातील एक सुलभ शौचालय आधुनिक आहे व त्यातील सुदरे जुने व जीर्ण झालेले आहे. जीर्ण झालेले शौचालय काढून त्याठिकाणी समाज उपयोगी वास्तु बांधण्यात यावी .

**<u>विषय क्र. १४७</u>**

पुणे महानगरपालिके मार्फत पुणे शहरातून त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय/अभियांत्रिकी /संगणकीय/व्यवस्थापन/विधी/वाणिज्य इ.) घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय एकूण ५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु.२ लाख एकदाच अर्थसहाय्य देणेबाबत मा.पक्षनेते सभा विषय क्र. ३६, दिनांक ६/६/२०१६ तसेच नसजा क्र.१४५५, दि.८/६/२०१६ रोजीच्या पत्राला अनुसरुन मा.महा. आयुक्त यांनी जा. क्र. मआ/ सविवि/५३२,दि. १६.११.२०१७ अन्वये पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**